


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १५१ ●रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# 'शिदे समितीला चर्चा करण्याचा अधिकारच नाही'

## जरांगेंनी फेटाळला न्या. शिंदे समितीकडून आलेला राज्य सरकारचा प्रस्ताव

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आंदोलकांशी चर्चा करण्याचा न्यायमूर्ती शिंदे समितीला कोणताही अधिकार नाही. सरकारला आमच्याबरोबर चर्चा करण्यास तोंड उरले नाही. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने काढा. हैदराबाद आणि सातारा संस्थांचे गॅझेटिअर लागू करण्याविषयी आणि बलिदान झालेल्या मराठा तरुणांच्या कुटुंबियांना मदतीविषयी कोणतीही तडजोड करणार नाही. असे जाहीर करून शिंदे समितीच्या माध्यमातून आलेला राज्य सरकारचा प्रस्ताव मनोज जरांगे यांनी स्पष्टपणे फेटाळून लावला.

मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलकांच्या मागण्यांवर निर्णय । घेण्यासाठी मंत्रिमंडळाची उप समिती आणि न्यायमूर्ती शिंदे समितीतील सदस्यांची शनिवारी सकाळी बैठक पार पडली. या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर सरकारचा प्रस्ताव घेऊन शिंदे समितीने दुपारी तीन वाजता जरांगे पाटील यांची भेट घेतली.

पण, मराठा आंदोलकांशी चर्चा करण्याचा न्यायमूर्ती शिंदे समितीला कोणताही अधिकार नाही. मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उप समिती किंवा सरकारमधील मंत्र्यांनी थेट चर्चा करण्याची गरज होती. पण, तसे झाले नाही. सरकारला आमच्याबरोबर चर्चा करण्यास तोंड उरले नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या वतीने शिंदे समितीने मांडलेला प्रस्ताव फेटाळून लावला.



तसेच शिंदे समितीने मागील १३ महिन्यांपासून हैदराबाद आणि सातारा संस्थांच्या गॅजेटचा अभ्यास केला आहे, त्यामुळे या बाबत आणखी वेळ देणार नाही, असेही स्पष्टपणे जाहीर केले. हैदराबाद आणि सातारा संस्थांच्या गॅझेटमध्ये कुणबी नोंदी आहेत. त्यामुळे ही दोन्ही गॅझेट तातडीने लागू करावे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठा हा कुणबीच आहे, असे गृहीत धरून उद्यापासून प्रमाणपत्राचे वाटप करावे. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने काढा. मुंबई

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● न्यायमूर्ती शिंदे समितीचा आदर

न्यायमूर्ती शिंदे समितीने तब्बल ५८ लाख कुणबी नोंदी उजेडात आणल्या. त्याचा साधारण तीन कोटी मराठा बांधवांना उपयोग झाला आहे, त्यामुळे शिंदे समिती विषयी समाजाला आदर आहे. या आदराचा फायदा घेऊन सरकार शिंदे समितीला आमच्याशी बोलणी करण्यासाठी पाठवत आहे. सरकारला आमच्याशी बोलणी करायला तोंडच राहिले नाही, असेही जरांगे म्हणाले.

### ● मराठा आंदोलकांना मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना बडतर्फ करा

मराठा आंदोलकांना आणि विशेष करून महिला, लहान मुली आणि मुलांना पोलिसांनी विनाकारण मारहाण केली आहे. अशा ५०-६० पोलिस अधिकारी आणि किमान १०० पोलिस कॉन्स्टेबलला दोषी ठरवून त्यांना तातडीने बडतर्फ करा. या मागणीवर जरांगे पाटील यांनी जोर दिला. मराठा समाजाने कुठल्याही पोलिसांवर हात उचचला नाही. तरीही आमच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत आणि पोलिसांनी ठरवून सामूहिकपणे आमच्यावर हल्ला केला, तरीही पोलिसांना संरक्षण दिले जात आहे, असा आरोप ही जरांगे यांनी केला.

# भीषण अपघाताने जिल्हा पुन्हा हादरला !

## देवदर्शनासाठी पायी निघालेल्या कंटेनरने चिरडलं, सहा जणांचा जागीच मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

बीडहून छत्रपती संभाजीनगरकडे भरधाव वेगात जाणाऱ्या कंटेनरने पायी जाणाऱ्या सहा तरुणांना पाठीमागून जोराची धडक दिल्याने या अपघातात सहा तरुण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाले. घटनास्थळी चार तरुण मयत झाले तर उपचारा दरम्यान दोन तरुणांचा मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की, घटनास्थळी रक्त मांसाचा सडा पडला होता. घटनेची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून कंटेनर चालकाला ताब्यात घेतले.



अनिकेत शिंदे | विशाल काकडे | पवन जगताप | अकाश कोळसे | किशोर तौर | दिनेश पवार





ही दुर्दैवी घटना सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास नामलगाव फाट्यावरील उड्डाण पुलाजवळ घडली. या घटनेने बीड शहरावर शोककळा पसरली आहे.

आज शनिवार असल्याने सहा तरुण पेंडगाव येथील प्रसिद्ध असलेल्या हनुमान मंदिराच्या दर्शनाला पायी जात होते. सकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान बीडहून छत्रपती संभाजीनगरकडे निघालेल्या कंटेनर (क्र. एन.एल. ०१ ए जी. ३१९७) ने या तरुणांना पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये आकाश अर्जुन कोळसे

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आंदोलनादरम्यान मुंबईत हृदयद्रावक घटना, पुन्हा एका मराठा आंदोलकाचा करुण अंत



● मुंबई येथे मराठा कार्यकर्त्याला हृदयविकाराचा झटका आल्यानं मृत्यू झाला आहे. मयत तरुण लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील टाकळगाव येथील असल्याची माहिती समोर आली आहे. विजय घोगरे असं मृत तरुण कार्यकर्त्याचं नाव आहे.

**लातूर । प्रतिनिधी**

राजधानी मुंबईतील आझाद मैदानात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा समाजाचं आंदोलन सुरु आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जरांगे पाटील यांनी केलीय. त्यासाठी, राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो मराठा बांधव मुंबईत पोहोचले असून काहीही झालं तरी आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतलीय. यादरम्यान, पुन्हा एका मराठा तरुण कार्यकर्त्याचा मृत्यू झाला आहे. मुंबई येथे आंदोलनात सहभागी असलेल्या विजय घोगरे या मराठा कार्यकर्त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झालाय. हा तरुण लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील टाकळगाव येथील रहिवासी असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, त्याला उपचारासाठी जे.जे रुग्णालयात हलवण्यात आलं होतं. मात्र, डॉक्टरने या कार्यकर्त्याला मृत घोषित केलं आहे. आपल्या मराठा कार्यकर्त्याच्या निधनाने संपूर्ण

▶▶ उर्वरित पान २ वर



*दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये श्रींची आरती करताना भाजपाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी न.प.सभापती नवनाथ अण्णा शिराळे, ॲड. गोविंद शिराळे, महेंद्र वाघमारे छायाचित्र दिसत आहेत.*

# भीषण अपघातानंतर डॉ.योगेश क्षीरसागरांची रुग्णालयामध्ये धाव; कुटुंबियांना दिला धीर

## पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्यामार्फत प्रशासनाला केल्या मदतीच्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पेंडगाव येथे श्री हनुमानरायांच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांना कंटेनरने जोरदार धडक दिली. यात सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना शहराजवळील नामलगाव फाटा परिसरात शनिवारी (दि.३०) सकाळी घडली. अपघाताची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर




यांनी तातडीने जिल्हा रुग्णालय गाठले. अपघातग्रस्त कुटुंबियांना धीर दिला. अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांशी संवाद साधत संपूर्ण परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी थेट उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना त्वरित मदतकार्य सुरू करण्याचे आदेश

▶▶ उर्वरित पान २ वर

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा : आ.संदीप क्षीरसागर

### ● मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना दिले पत्र

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा क्षेत्रात मागील दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे पूर्ण करुन सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर (का) तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने क्षेत्रातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या क्षेत्रातील उभा असलेला कापूस, सोयाबीन, बाजरी आदीं पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान



झाले आहे. तसेच पशुहानीसह शेतकरी व ग्रामस्थांच्या घरांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या घरांचे, पिकांचे व पशुहानीचे तातडीने पंचमाने करण्यासाठी बाबतचे आदेश विभागाला द्यावेत, जेणेकरून शेतकरी बांधवाला सरसकट आर्थिक मदत मिळेल. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रातून केली आहे.

# मराठा समाजाच्या हक्कासाठी निर्णायक लढा..!

## शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आझाद मैदान मुंबई येथे मनोज दादा जरांगे पाटील यांची घेतली भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई येथे मराठा आरक्षण लढ्याचे शिलेदार मा.श्री. मनोज दादा जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले आहेत. मागील अनेक महिन्यांपासून समाजाच्या मागण्यांबाबत शासनास वारंवार कळवूनही ठोस निर्णय न घेतल्याने हा लढा आता थेट जनआंदोलनात परिवर्तित झाला आहे. लाखोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबईत दाखल झाले आहेत. मातांच्या




आशीर्वादाने, तरुणांच्या जिद्दीने आणि समाजाच्या ऐक्याने उभा राहिलेला हा संघर्ष न्याय मिळेपर्यंत थांबणार नाही. शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन मनोज दादांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# वाल्मिक कराडला सुट्टी नाही

## सरपंच हत्याप्रकरणी बीड न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या वाल्मिक कराडचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे. कारण, बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. या दरम्यान न्यायालयाने आरोपी वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला



आहे. त्यामुळे, वाल्मिकच्या अडचणीत आणखी वाढ झाली असून तुरुंगातून त्याची सुट्टीच नाही, हे स्पष्ट झालं आहे. दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्यानंतर बीडसह राज्यभरातून संतापाची लाट पाहायला मिळाली. विधिमंडळातही हे प्रकरण चांगलंच गाजलं होतं. त्यानंतर, बीडमधील नेते आणि आमदार धनंजय मुंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देखील द्यावा लागला. दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात

▶ उर्वरित पान २ वर



# ज्येष्ठा गौरी - इतिहास आणि उद्देश (31.8.2025)



पुराणात अशी कथा आहे, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना आणि पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले ; म्हणून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात.

### • व्रत करण्याची पद्धत

अ. हे व्रत तीन दिवस चालते. प्रांतभेदानुसार हे व्रत करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये धातूची, मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्री महालक्ष्मीचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. (महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुले येणार्या वनस्पतीची रोपे अथवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवतात आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवतात. – ही एक रूढी आहे.)

आ. गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसर्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात.

इ. तिसर्या दिवशी गौरीचे नदीत विसर्जन करतात आणि परत येतांना नदीतील थोडी वाळू किंवा माती घरी आणून ती सर्व घरभर पसरवतात.'

आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने हिंदु धर्मशास्त्रात सांगितलेला पर्याय अर्थात् 'आपद्धर्म' ! सध्या जगभरात कोरोना महामारीमुळे सर्वत्रच लोकांच्या दळणवळणावर अनेक बंधने आली आहेत. भारतातही विविध राज्यांमध्ये दळणवळण बंदी (लॉकडाऊन) आहे. काही ठिकाणी कोरोनाचा प्रादुर्भाव अल्प असला, तरी तेथे लोकांच्या घराबाहेर पडण्यावर अनेक बंधने आहेतच. यामुळे हिंदूंचे विविध सण, उत्सव, व्रते नेहमीप्रमाणे सामूहिकरित्या करण्यावर बंधने आली आहेत. कोरोनासारख्या आपत्काळाच्या पार्श्वभूमीवर हिंदु धर्माने धर्माचरणात काही पर्याय सांगितले आहेत. यास 'आपद्धर्म' असे म्हणतात.

आपद्धर्म म्हणजे 'आपदि कर्तव्यो धर्मः ।' म्हणजे 'आपत्काळात धर्मशास्त्राला मान्य असलेली कृती.'

काही घरांमध्ये भाद्रपद शुक्ल पक्ष अष्टमीच्या दिवशी ज्येष्ठा गौरींचे पूजन केले जाते. हे काही घरांमध्ये खड्यांच्या स्वरूपात, तर काही घरांमध्ये उभे मुखवटे करून त्यांची पूजा केली जाते. कोरोनाच्या संकटामुळे ज्यांना प्रतिवर्षाप्रमाणे खड्यांच्या स्वरूपात अथवा मुखवट्यांच्या स्वरूपात त्यांची पूजा करणे शक्य नाही, ते आपल्या घरातील एखाद्या देवीच्या मूर्तीची अथवा चित्राची पूजा करू शकतात.

अशौच असेल, तर गौरी आवाहन आणि पूजन करू नये

भाद्रपदातील महालक्ष्मीच्या (गौरीच्या) वेळी अशौच असेल, तर गौरी आवाहन आणि पूजन करू नये. अशौचामुळे तेव्हा गौरीपूजन न करता आल्याने काही जण पुढे आश्विन मासात (महिन्यात) गौरीपूजन करतात, पण तसे करू नये. अशा प्रसंगी त्याचा लोप करणे (म्हणजे ते न करणे) युक्त होय.

### • दोरकग्रहण

अ. 'ज्येष्ठा गौरीच्या पूजेच्या वेळी दोरक ठेवून विसर्जनानंतर तो दोरक घेतला जातो. दोरक घेण्याच्या विधीस 'दोरकग्रहण' असे म्हणतात. दोरक म्हणजे हाताने काढलेल्या सुताचे सोळा पदरी हळदीत भिजवून रंगवलेले सूत्र होय. सोळा ही संख्या लक्ष्मीशी निगडित असल्यामुळे दोरकातही सोळा पदर असतात.

आ. हा दोरक अत्यंत शुभकारक आणि लक्ष्मीप्राप्ती करून देणारा असतो. घरातील सर्व स्त्रिया दोरक धारण करतात. काही प्रांतांत पुरुषही आपल्या हातात हा दोरक धारण करतात. काही जण हा दोरक आपल्या धनकोशात, धान्यकोठारात, वास्तूच्या पायात आणि देवघरात ठेवतात.

इ. ज्येष्ठा गौरीपूजन हा एक कुळाचार आहे. त्यामुळे कोश (मिळकतीचे साधन) आणि चुली (स्वयंपाकघर) निराळे होताच प्रत्येक स्वतंत्र कुटुंबात हे व्रत करणे अत्यावश्यक असते.'

(शास्त्र असे सांगते ! (भाग–१) तृतीया वृत्ती, आठवे पुनर्मुद्रण : जानेवारी १९९९. प्रकाशिका : सौ. मृणालिनी देशपांडे, वेदवाणी प्रकाशन, फुलेवाडी, कोल्हापूर – ४१६०१०, महाराष्ट्र)

### • ज्येष्ठा गौरीचे व्रत केल्यामुळे होणारी फलप्राप्ती

अ. सौभाग्याचे रक्षण होणे

काही वेळा स्त्रिया स्वत:च्या सौभाग्याचे रक्षण होण्यासाठी श्री महालक्ष्मीदेवीला उद्देशून ज्येष्ठा गौरीचे व्रत करतात. त्यामुळे व्रत करणार्या स्त्रियांवर महालक्ष्मीदेवीची कृपा होऊन त्यांच्या सौभाग्याचे रक्षण होते.

आ. ऐहिक आणि पारमार्थिक लाभ होणे

ज्येष्ठा गौरीचे व्रत केल्याने श्री गणेशासह रिद्धी आणि सिद्धी यांचे कृपाशीर्वाद लाभून ऐहिकदृष्ट्या भरभराट होते अन् आध्यात्मिक क्षेत्रात विविध सिद्धींची प्राप्ती होते.

इ. गणेशतत्त्वाचा पूर्ण लाभ होणे

रिद्धी आणि सिद्धी यांसह कार्यरत असणारे गणेशतत्त्व पूर्ण असल्यामुळे ज्येष्ठा गौरीचे व्रत केल्याने उपासकाला गणेशतत्त्वाचा पूर्ण लाभ होतो.

### • गौरी आणि श्री गणेश यांना प्रार्थना !

'हे गौरी आणि श्री गणेशा, तुमची कृपादृष्टी सर्वांवर अशीच अखंड राहू दे आणि सर्वांना धर्माचरण तसेच साधना करण्याची सुबुद्धी होऊ दे. व्यष्टी साधना आणि हिंदु राष्ट्राची स्थापना यांमध्ये येणारे स्थूल अन् सूक्ष्म स्तरांवरील अडथळे दूर होऊ दे', अशी तुमच्या चरणी प्रार्थना आहे.'

**संदर्भ : सनातन–निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

# महाराष्ट्र कारागृह विभाग ध्वज दिन



महाराष्ट्र कारागृह विभागाला दिनांक ०१ सप्टेंबर १९६९ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत वसंतरावजी नाईक यांच्या हस्ते प्रथमच नवा ध्वज अर्पण करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री नाईक भाषणातून आपले विचार मांडत हा ध्वज ऐक्याचे, श्रध्देचे कर्तव्याचे आणि अभिमानाचे प्रतिक असून त्याची या विभागामार्फत् मान राखला जाईल असा मला विश्वास वाटतो असल्याचे म्हणाले होते.

ध्वज हे शिस्त जबाबदारी एकता व मानाचे चिन्ह मानले जाते. कारागृह विभागाचा ध्वज त्याचेच प्रतीक आहे. या ध्वजाबरोबर कारागृह विभागाच्या जबाबदाऱ्या कशा वाढल्या आहेत. राज्यातील तुरुंगात सुरक्षा, शिस्त आणि शांतता राखणे ही या विभागाची मुलभूत जबाबदारी आहे. याशिवाय बंदीजनांना सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न करणे ही कारागृह विभागाची जबाबदारी आहे. या समारंभास तत्कालीन महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी, गृहखात्याचे उपमंत्री कल्याणराव पाटील त्याचप्रमाणे प्रमुख निमंत्रीत नागरीक उपस्थित होते. ध्वज अर्पण समारंभा प्रसंगी कारागृह विभागाचे तत्कालीन महानिरीक्षक दौलतराव जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले होते. तुरुंगाधिकारी आणि रक्षक दलाचे परेड संचालन, तुरुंग अधिकारी एस. आर. चव्हाण यांनी केले.

महात्मा गांधी यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण– दि.०१ सप्टेंबर १९६९ रोजी मा. दिवंगत मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांनी येरवडा मध्यवर्ती कारागृहाला महात्माजी या कारागृहात असताना जेथे कारावासात होते. त्या यार्डास भेट देवून आदरांजली वाहिली. त्या खोलीच्याच पुढील आवारात सुमारे पाचशे रुपये खर्चुन उभारण्यात आलेल्या महात्मा गांधीजीच्या अर्धपुतळयाचे अनावरण मुख्यमंत्री नाईक यांच्या हस्ते झाले. हा पुतळा श्री. बाबुराव महाडीक इनस्ट्रक्टर येरवडा मध्यवर्ती कारागृह यांनी आनंदा ज्ञानु शिंदे, बंडा गुंडाप्पा सुतार आणि ईश्वरी केरु कुंभार या बंदीजनाच्या सहाय्याने तयार केला आहे. महात्माजींच्या अर्धपुतळयाचे अनावरण चालू असताना कारागृहातील काही महिला बंदी सुरेल. आवाजात भजने म्हणत होत्या.

हुतात्मा स्मारक अनावरण– सोलापूर नगरपालिकेने इ.स. १९६१ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्र्याना पत्राव्दारे विनंती केली की, येरवडा कारागृहात सोलापूरच्या श्री. मल्लाप्पा धनशेट्टी व इतर चार सुपुत्राना फाशी देण्यात आली. त्यांचे यथोचित स्मारक उभारण्यात यावे. या विनंतीनुसार महाराष्ट्र शासनाने येरवडा मध्यवर्ती कारागृहात ज्यांनी स्वातंत्र्य संग्रामांत कारावास भोगला व आत्मार्पण केले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे परिसरात स्मारक उभारण्याचे ठरविले. त्यानुसार तुरुंग विभागातर्फे सुमारे १५००/–रुपये खर्चुन हे स्मारक उभारण्यात आले. त्याचे अनावरण दि.०१ सप्टेंबर १९६९ रोजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या हस्ते तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा पुणे–०१ येथे करण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात येरवडा मध्यवर्ती कारागृहात ज्यांनी बंदिवास भोगून आत्मार्पण केले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | हुतात्म्याचे नाव | हौतात्म्याचा दिवस |
|---|---|---|
| 1) | श्री. दामोदर हरी चाफेकर | १४/०४/१८९८ |
| २) | श्री. वासुदेव हरी चाफेकर | ८/०५/१८९९ |
| 3) | श्री. महादेव विनायक रानडे | 10/05/1899 |
| ४) | श्री. बाळकृष्ण हरी चाफेकर | १२/०५/१८९९ |
| ५) | सुलमान शाह रोजन मोहम्मद | ०६/०७/१९२२ |
| ६) | ईस्माईल अल्लारखा वल्द अल्लारखा | ६/०७/१९२२ |
| ७) | मोहम्मद शबन भिकारी | ०६/०७/१९२२ |
| ८) | बंधु फरिदन वल्द फरिदन | ०६/०७/१९२२ |
| ९) | श्री. जगन्नाथ भगवान शिंदे | १२/01/1931 |
| 10) | श्री. मल्लाप्पा रेवणसिध्दप्पा धनशेट्टी | १२/01/1931 |
| 11) | श्री. अब्दुला रसूल कुर्बाहुसेन | १२/01/1931 |
| १२) | श्री. श्रीकृष्ण लक्ष्मीनारायण सारडा | १२/01/1931 |
| 13) | श्री. शंकर रामचंद्र सोमण | १२/01/1931 |

अशाप्रकारे मा. मुख्यमंत्र्यांनी समारंभ झाल्यानंतर कारागृहातील वस्तूची पाहणी केली त्यामध्ये भाजीपाल्याची विशेष प्रशंसा केली.

**शब्दांकन... पेट्रस जोसेफ गायकवाड,**
**अधिक्षक बीड जिल्हा कारागृह वर्ग–२**

◆ पान १ वरून पुढे...

## 'शिंदे समितीला....

सरकार आणि औंध संस्थांनच्या गॅजेटचा अभ्यास करण्यासाठी समितीला आम्ही आणखी वेळ देण्यास तयार आहोत. समितीने त्याचा अभ्यास करून कुणबी नोंदी शोधाव्यात. पण, मराठा आंदोलनात बलिदान दिलेल्या तरुणांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत तातडीने दिली गेली पाहिजे. त्याविषयी कोणतीही तडजोड करणार नाही. तसेच मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सरसकट मागे घ्या, त्यासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मनोज जरांगे यांनी जाहीर केली.

## भीषण अपघाताने....

(रा. बीड), दिनेश दिलीप पवार (रा. नाळवंडी नाका), विशाल श्रीकृष्ण काकडे (रा. शेकटा ता. गेवराई), किशोर गुलाब तावरे (रा. गेवराई), अनिकेत रोहीदास शिंदे (रा. शिदोड) आणि पवन शिवाजी जगताप (रा. अंबिका चौक) हे सहा जण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाले. घटनास्थळी चौघा जणांचा मृत्यू झाला तर उपचारा दरम्यान दोघे मयत झाले. अपघात इतका भीषण होता की, घटनास्थळी रक्त–मांसाचा सडा पडला होता. घटनेची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. मृतदेह जिल्हा रुग्णालयामध्ये

◆ पान १ वरून पुढे...

शवविच्छेदनासाठी आणण्यात आले होते. कंटेनर चालकाला पोलिसांनी अटक केली. सदरील या दुर्दैवी घटनेची माहिती मयत तरुणांच्या घरच्या लोकांना व मित्र परिवाराला माहिती झाल्यानंतर अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली. मयतांच्या नातेवाईकांच्या आक्रोशामुळे जिल्हा रुग्णालय परिसर सुन्न झाला होता. घटनेची माहिती झाल्यानंतर अनेक राजकीय नेत्यांनी आणि कार्यकत्यारनी जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. या दुर्दैवी घटनेने बीड शहरावर शोककळा पसरली आहे.

## मराठा आंदोलनादरम्या...

आंदोलकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. यापूर्वी जुन्नरजवळ एका मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे. सतीश देशमुख असं त्या मृत व्यक्तीचं नाव असून, मनोज जरांगेंच्या मुंबईतील उपोषणाला सुरूवात होण्याआधीच ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

## भीषण अपघातानंतर...

दिले असून शासनाच्या माध्यमातून मृतांच्या कुटुंबियांना तातडीची आर्थिक मदत मिळवून देण्यात येणार आहे. डॉ.क्षीरसागर यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांशी चर्चा करून आरोग्य विभागामार्फत संपूर्ण अहवाल

◆ पान १ वरून पुढे...

शासनाकडे पाठवण्याच्या सूचना दिल्या. यावेळी सरपंच गणेश खांडे, नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, दत्ता जाधव यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, या अपघातात आकाश कोळसे, दिनेश पवार, किशोर तौर, (सर्व रा.बीड), अनिकेत शिंदे, पवन जगताप, विशाल काकडे (सर्व रा.शिदोड) यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेबद्दल हळहळ व्यक्त करताना रस्त्यावरून पायी प्रवास करताना सर्वांनी सतर्क राहावे, मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांसोबत मी ठामपणे उभा आहे, असे आश्वासन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले.

## मराठा समाजाच्या...

योग्य मागण्या मान्य कराव्यात, हीच समाजाची एकमुखी अपेक्षा आहे. आजपासून सुरू झालेल्या या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी मनोज दादांची भेट घेतली व समाजाच्या आरक्षण आंदोलनात सहभाग नोंदवला.

## वाल्मिक कराडला...

वाल्मिक कराडचा संबंध कशाप्रकारे नाही, असा युक्तिवाद मागील सुनावणीत कराडच्या वकिलांच्या माध्यमातून तब्बल तीन तास करण्यात आला होता. तसेच, या प्रकरणात वाल्मिक कराडला जामीन मिळावा यासाठी विशेष

◆ पान १ वरून पुढे...

न्यायालयात अर्ज देखील दाखल करण्यात आला होता. त्यावर निर्णय देत आज न्यायालयाने हा अर्ज नामंजूर करत फेटाळून लावला. त्यामुळे आता कराडच्या वकिलांकडून पुढे काय पावलं उचलली जातात? याकडेच लक्ष लागले आहे. वाल्मिक कराडवर गंभीर गुन्हा दाखल असल्याने कराडचा अर्ज फेटाळत असल्याचं निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. दरम्यान, वाल्मिक कराडसह ५ आरोपींना पोलिसांनी सरपंच देशमुख हत्याप्रकरणात अटक केली असून अद्याप एक आरोपी फरार आहे. पोलिसांकडून त्या आरोपीचा शोध घेतला जात असल्याचे सांगण्यात येते.

दोषमुक्ती अर्जावर १० सप्टेंबर रोजी सुनावणी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील आरोपींचे जामीन आणि दोषमुक्ती अर्जावर आज न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयात झालेल्या सुनावणीत काही आरोपींच्या अर्जांवर निर्णय राखून ठेवण्यात आला. तर काही अर्जांबाबत मूळ फिर्यादीचे म्हणणे न्यायालयासमोर न आल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली. या खटल्यातील महत्त्वाचा आरोपी वाल्मिक कराड याच्या जामिनाबाबत निर्णय देत जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. तर, काही आरोपींनी केलेल्या दोषमुक्तीच्या अर्जावरील सुनावणी १० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. आजच्या सुनावणीनंतर पुन्हा एकदा हा खटला चर्चेत आला असून, पुढील तारखेला होणाऱ्या सुनावणीवर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## अतिवृष्टीने बाधित...

सूचना केल्या. परळी मतदारसंघातील लाडझरी येथील तलाव फुटल्याने त्या पुढील तीन गावांमध्ये पुराचे पाणी जाऊन नुकसान झाले असून याबाबत स्वतंत्र पंचनामे करण्यात यावेत, तसेच धोक्याची पातळी ओलांडलेल्या लहान–मोठे तलाव धरणांची माहिती प्रसिद्धेश देऊन नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात यावे अशाही सूचना धनंजय मुंडे यांनी दिल्या. दरम्यान अनेक ठिकाणी पावसामुळे रस्ते वाहून गेले किंवा खचले असून अशा रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम किंवा जिल्हा परिषद अशा संबंधित यंत्रणांना दुरुस्ती करण्यासंबंधीचे प्रस्ताव तातडीने पाठवण्यात यावेत असेही निर्देश यावेळी धनंजय मुंडे यांनी दिले. महावितरण कडील प्रलंबित असलेल्या विविध कामांसह, विविध उपकेंद्रांच्या अंतर्गत पावसाने झालेले नुकसान, बोल किंवा तारा तुटण्याचे प्रकार याबाबत स्थानिक गावातील सरपंच किंवा पदाधिकाऱ्यांनी जरी कळवले तरी त्याबाबतीत तातडीने ॲक्शन घ्यावी जेणेकरून कुठलेही गाव अंधारात राहणार नाही अशाही सूचना धनंजय मुंडे यांनी महावितरणचे अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस युवक नेते तथा माजी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, ॲड गोविंदराव फड, मार्केट कमिटीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, माऊली तात्या गडदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, प्रा मधुकर आघाव, राजाभाऊ पोळ, माणिक भाऊ फड, पिंटू मुंडे, चंद्रकांत कराड, विष्णुपंत देशमुख यांसह मतदारसंघातील सर्व गट व गणप्रमुख त्याचबरोबर उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, महावितरण चे कार्यकारी अभियंता श्री डाकरे व श्री चाटे, उप अभियंता अभिजित राठोड, परळीचे गटविकास अधिकारी संजय केंद्रे, अंबाजोगाई येथील गटविकास अधिकारी श्रीमती दिवाणे, यांसह महसूल, जिल्हा परिषद, आरोग्य, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम इत्यादी विभागाचे अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

## करचुंडी येथील...

धरणे आंदोलन सुरू आहे. त्याची अद्याप दखल प्रशासनातील कुठल्याच अधिकाऱ्याने घेतलेला आहे. या धरणे आंदोलनकर्त्यांमध्ये चार लोक आजारी पडले आहेत. गावात पिण्याच्या पाण्याचे व्यवस्था नाही, धड काँक्रीटचे व्यवस्थित रस्ते नाही, दलितांसाठी स्मशानभूमी नाही, नळ योजना आल्या पण फक्त कागदावरच खूप मोठा भ्रष्टाचार गावामध्ये झाला आहे. घरकुल योजना देखील काही ठराविक लोकांना दिली गेली त्यात मागासवर्गीय लोकांना डावला गेला आहे. राहिलेल्या लोकांच्या नावे सातबारावर नावे लावावी अशा मागणीसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. जोपर्यंत प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत मी आपल्याला बंद होणार नाही अशी भूमिका आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयसिंग वीर यांनी घेतले आहे. त्यातच शासनाने शेतकऱ्यांची कसलीही संमती नसताना परस्पर जमीन वनविभागाच्या नावावर वर्ग केली आहे. या आंदोलनात दिवसेंदिवस सर्वच पक्ष संघटना व समाजसेवकांचा पाठिंबा मिळत आहे.

## बीड शहराला...

सध्या पावसाचे प्रमाण चांगले असून, बीड शहराला पाणी पुरवठा करणारी धरणे ओव्हर फ्लो झाली आहेत. मात्र, त्याचा लाभ शहरातील नागरिकांना मिळत नाही. पेठ बीड भागातील फिल्टर प्लांट वरून शहरातील ४०% पाणी पुरवठा केला जातो, तर उर्वरित पाणी बिंदुसरा प्रकल्प पाली येथील फिल्टर प्लांट वरून करण्यात येतो. पाली येथील बिंदुसरा प्रकल्प म्हणजेच पाली डॅम व माजलगाव डॅमही पूर्णपणे भरलेले आहे, त्यामुळे बीडकरांना दररोज पाणी पुरवठा केला जावा, अशी मागणी पुरुषोत्तम उर्फ (गोटू) वीर यांनी केली आहे. हे आव्हान लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करत, पाण्याच्या वितरण पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. व्यवस्थेची गती वाढविणे आणि नागरिकांच्या जीवनात सोयीसुविधांची दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे.

## "बीडमध्ये आमदार...

आयोजित करण्यात आला. आ. गोरखे यांनी प्रथम अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर दणदणीत स्वागताच्या गजरात त्यांचा १०० किलो वजनाचा हार क्रेनच्या सहाय्याने अर्पण करून सत्कार करण्यात आला. हा अनोखा सोहळा शहरवासीयांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. गेल्या तीस वर्षांनंतर मातंग समाजाला समाजाशी जिव्हाळा, प्रेम आणि ठामपणे आवाज उठवणारे नेतृत्व मिळाल्याचा अभिमान या वेळी व्यक्त झाला. सत्कार समारंभास विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. शेवटी आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# देवेंद्र फडणवीसांना अडचणीत आणण्यासाठी शिंदेंकडून आंदोलकांना मदत : राऊतांचा गंभीर आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाची मागणी लावून धरत मनोज जरांगे यांनी कालपासून पुन्हा उपोषणाचे अस्त्र उपसले असून मुंबईतील आझाद मैदानात त्यांचं उपोषण सुरू आहे. हजारो मराठ आंदोलक, समर्थकही मुंबईत दाखल झाले असून आरक्षण मिळाल्याशिवाय हटणार नाही असाच पवित्रा सर्वांनी घेतला आहे. या मुद्यावरून सध्या राजकीय वातावरणही पेटलं असून आंदोलनात मध्यमार्ग काढण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे.

दरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे नेते, संजय राऊत यांनी पुन्हा या मुद्यावरून भाष्य केलं असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी जरांगेंची भेट घ्यावी, जेणेकरून त्यातून काही मार्ग काढता येईल असं राऊत म्हणाले. फडणवीसांनी प्रमुख विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा केली पाहिजे असं राऊत म्हणाले. एवढंच नव्हे तर फडणवीसांना अडचणीत आणण्यासाठी शिंदेंकडून आंदोलकांना मदत केली जात आहे, हायुतू असा आरोपही संजय राऊत यांनी केला आहे.



कालही राऊतांनी मराठा आरक्षणाच्या मोर्चाच्या मुद्यावरून भाष्य केलं होतं. मराठा आंदोलनाचे नेते, जरांगे जिथे बसले होते, त्या मराठवाड्यात सरकारच्या वतीने अधिकारी गेले होते, पण तिथे जर खुद्द मुख्यमंत्री फडणवीस गेले असते, त्यांच्याशी चर्चा केली असती तर हे वादळ मुंबईत आलंच नसतं. मुख्यमंत्र्यांनी दोन पावलं मागे जायला हवं होतं,असं राऊत म्हणाले होते. तर आज त्यांनी पुन्हा मराठा आंदोलनावर भाष्य करताना शिंदेंवर आरोप केले.

काय म्हणाले संजय राऊत ?- मराठा आंदोलनावर मार्ग काढायचा असेल तर या मुद्यावर महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्षनेत्यांशी, माजी मुख्यमंत्री आहेत, त्यांच्याशी मुख्यमंत्री फडणवीस यांनी चर्चा केली पाहिजे. अहंकार बाजूला ठेवून प्रमुख विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा करून, त्यांच्यासह मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली पाहिजे. आणि त्यातून काय मार्ग काढता येईल हा एकत्र बसून सामुदायिक निर्णय घेणं गरजेचं आहे, असं राऊत म्हणाले.

शिंदेंवर गंभीर आरोप- महायुती सरकारमध्ये तीन गट आहेत, मिध्यांचा ( शिंदे गट) विषय वेगळा आहे. फडणवीसांना अडचणीत आणण्याशाठी शिंदे हे आंदोलकांना वेगळ्या पद्धतीने मदत करत आहेत असा आरोप राऊतांनी केला. तर देवेंद्र फडणवीस यांची भूमिका वेगळी आहे, ते परशुराम महामंडळवाले आहेत. आणि मिस्टर. अजित पवार हे तर चीनच्या भिंतीसारखे तटस्थ आहेत, त्यांची काही प्रतिक्रियाच नाहीये. अशा परिस्थितीत राजकीय इच्छाशक्ती येणार कुठून ? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे उत्तराधिकारी व सचिवपदी महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांची निवड

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान, बेलगाव या प्राचीन व ऐतिहासिक संस्थानच्या उत्तराधिकारी पदी व सचिव पदाची सूत्रे महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्याकडे सोपविण्यात आली. या निवडीचे स्वागत करत लिंबागणेश गावात भाविकांच्या वतीने जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यावेळी बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महादेव महाराज भारती तसेच गुरूवर्य धर्मराज दादा सामनगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मिरवणुकीदरम्यान डोल-ताशे, ढोल-लेझीम, टाळ-मृदुंगाचा गजर आणि भगव्या पताक्यांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. शांतीब्रह्म महाराज की जय या घोषणांनी गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. प्रतिष्ठित नागरिक आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या महंतांचे उत्साहात स्वागत केले.



## पावसाळ्यात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा हिवताप कार्यालयाकडून अबेटिंग मोहीम

**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या किटकजन्य आजारांमुळे जिल्हा हिवताप कार्यालयाने बीड शहरात एक धडक मोहीम राबविली आहे. या मोहिमेचे मार्गदर्शन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ आणि जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

सध्या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बीड शहरात पाणी साठवणार्या जागांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे, यामुळे डासांच्या आळ्यांचे प्रमाण वाढले आहे. तसेच पाणी साठवणारे हौद, माठ, सिमेंटची टाकी व इतर प्रकारच्या पाण्याच्या साठ्यांमध्ये डासांची लारवा पिकून किटकजन्य आजारांसाठी पोषक वातावरण तयार होत आहे. यामुळे, नागरिकांनी डेंग्यू, चिकनगुनिया, हिवताप आणि इतर किटकजन्य आजारांच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी सक्रियपणे योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मोहिमेचा भाग म्हणून बीड शहरात विविध भागांमध्ये अबेटिंग आणि गप्पी मासे सोडण्याची कार्यवाही सुरू आहे. जिल्हा हिवताप कार्यालयाच्या टीमने प्रत्येक घरांमध्ये आरोग्य शिक्षण देऊन, पाणी साठवणार्या ठिकाणी गप्पी मासे सोडण्याची सूचना केली आहे. तसेच, आठवड्यातून एक दिवस त्या साठ्यांना स्वच्छ करण्यासाठी सुचवले आहे.

आज इंदिरानगर भागामध्ये अबेटिंग कार्यवाही करण्यात आली, जिथे गप्पी मासे सोडण्याची प्रक्रिया राबवली गेली. त्याचप्रमाणे, नागरिकांनी कीटकजन्य आजारांपासून बचावासाठी मच्छरदाणी, कॉईल्स आणि लिक्विड मच्छरदाणीचा वापर करून घरांमध्ये धूर करावा, असेही सांगितले गेले आहे.



## राज्य नाट्य स्पर्धेच्या प्रवेशिका सादर करण्याकरिता १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ : मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या, राज्य नाट्य स्पर्धेतील प्रवेशिका सादर करण्यास १० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य नाट्य स्पर्धेतील विविध वर्गवारीसाठी प्रवेशिका सादर करण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट हा होता. मात्र गणेशोत्सव, पाऊसमान आणि इतर बाबीमुळे काही नाट्यसंस्था व संघटनांनी या प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्याकडे केली होती. जास्तीत जास्त संघाना या स्पर्धेत भाग घेता यावा यासाठी, प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करून सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांनी प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य संचालनालयास केली होती. या सूचनेच्या अनुषंगाने प्रवेशिका सादर करण्यास दिनांक १० सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे. या मुदतवाढ निर्णयाच्या अनुषंगाने, राज्य नाट्य वर्गवारींच्या स्पर्धांत भाग घेण्यास इच्छुक असलेले संघ, ऑनलाईन पद्धतीने दिनांक १० सप्टेंबर पर्यंत प्रवेशिका सादर करू शकतील, असे प्रसिद्धीपत्रक सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रसिद्ध केले आहे. संबंधित संघानी https://mahanatyaspardha.com या संकेतस्थळवार ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा, असेही प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

## के.एस.पी.विद्यालय येथे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त व क्रीडा सप्ताहातील दुसरा दिवस उत्साहात संपन्न..

**बीड । प्रतिनिधी**

दि.३०/०८/२०२५ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथाक्रिडा परिषद बीड यांच्या संयुक्त विदयमानाने के. एस.पी. विद्यालय, बीड येथे क्रीडा परिसंवादाचे आयोजन, तंदुरुस्ती विषयक चर्चासत्र, मैदानी व इनडोअर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिना निमित्त भारतात क्रीडादिन म्हणून दि.२९ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. खेळ ही एक शारीरिक व मानसिक कला आहे. खेळल्यामुळे शारीरिक विकास साधतो तसेच मानसिकताही प्रबळ बनते.

दररोज किमान अर्धा ते एक तास कोणतातरी खेळ खेळला पाहिजे. खेळामुळे चपळता वाढते त्याचप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही घडतो. खेळाचे वेगवेगळे प्रकार आहेत. वेगवेगळे खेळ वेगवेगळ्या पद्धतींनी खेळले जातात. खेळांमध्ये बैठे खेळ व मैदानी खेळ असे दोन प्रकार आहेत.




*भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगरपालिका सभापती नवनाथांना शिराळे पाटील निवड झाल्याबद्दल बीड शहरातील संभाजी महाराज क्रीडांगण येथे बीड शहरातील सर्व मित्रांनी सत्कार केला यावेळी कल्याण रावजी वाघमारे रामनाथ जी डाके भानुदाजी कंठाळे सर बाळासाहेब गावडे सर किसनजी वळेकर शिवाजीराव पवार गायकवाड साहेब वराड साहेब माणिकराव वेदपाठक मसुरे साहेब योगेश नाकाडे इत्यादी यावेळी उपस्थित होते.*

## कृषीकुलच्या "माहिती" गाडीचे जलनायक मयंक गांधी यांच्या उपस्थितीत लोकार्पण

### शेतीत परिवर्तन घडवण्यासाठी माहितीची नांदी ; कृषीकुलची फिरती गाडी आता गावोगावी

**परळी वै. । प्रतिनिधी**

जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेली कृषीकुल ही सामाजिक संस्था शेतकऱ्यांसाठी कार्यरत असून, राज्यभरातील हजारो शेतकरी येथे फळबाग लागवडीचे प्रशिक्षण घेऊन यशस्वी शेती करू लागले आहेत. टाटा सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आलेल्या परीक्षण अहवालानुसार शेतकऱ्यांच्या उत्पन्नात पूर्वीपेक्षा जवळपास दहा पटींनी वाढ झालेली दिसून येते. आणखी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषिकुल संदर्भातील माहिती व्हावी व त्यांना फळबाग लागवडीचे प्रशिक्षण मिळावे असा संस्थेचा प्रामाणिक आणि शुद्ध हेतु आहे. कृषिकुल बद्दलच्या सामाजिक कामांची संपूर्ण माहिती फिरत्या मोबाईल गाडीद्वारे शेकऱ्यांपर्यंत पोचवली जाणार असून या गाडीचे शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. कृषीकुल (सिरसाळा) येथे हा लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सौ.मिनल गांधी, शाम पंम्मी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.




## मोरया मोरया... मंगलमुर्ती मोरया या जयघोषामुळे अवघे पिंपळनेर मंगलमय

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया... मंगल मुर्ती मोरया... च्या घोषात घरोघरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे 'श्री'ची प्रतिष्ठापना करण्यात आलेलीआहे.श्री च्या आगमनाने घरोघरी मंगलमय वातावरण झालेले आहे .

काही ठिकाणी घरगुती बसवलेला दीड दिवसांच्या बाप्पाला निरोपही देण्यात आला. सार्वजनिक गणेश मंडळांसह पिंपळनेर परिसरात बाप्पांचे पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात... फुलांची उधळण व फटक्यांच्या आतषबाजीत स्वागत केले गेले. यावेळी सार्वजनिक गणेश मंडळांनी डीजेला फाटा दिला. अनेक ठिकाणी इको फ्रेंडली गणेशमूर्ती - यावर्षी इको फ्रेंडली गणेशमुर्ती खरेदी करण्याकडे अनेकांचा कल राहिला. प्लास्टर ऑफ पॅरिसच्याच्या कमी आकाराच्या मूर्तींची विक्री तुलनेने कमी झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. गणेशचतुर्थीदिवशीच पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये उत्साह संचारला होता. पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती . त्यामुळे अबालवृध्दांचा उत्साह द्विगुणीत झाला होता. यावेळी बाप्पांच्या स्वागताचा थाटमाट पाहता बाप्पांवर असलेली नितांत श्रध्दा तसेच तोच खरा विघ्नहर्ता असल्याचा विश्वास ठायी ठायी जाणवत होता.. सनई-चौघडे ढोल-ताशांच्या निनादात उत्साहपूर्ण वातावरणात मांगल्याचे प्रतीक असलेल्या बुध्दिदेवता श्री गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मिरवणूक काढून गणरायाची प्रतिष्ठापना केली. मोरया मोरया... मंगलमुर्ती मोरया या जयघोषामुळे गावागावात मंगलमय वातावरण झाल्याचे पहावयास मिळत आहे .



# हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट प्रशिक्षक व संघटक यांचा जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांचे हस्ते गौरव करण्यात आला. भारत सरकार, आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने दरवर्षी दि. २९ ऑगस्ट, २०२५ हा दिवस हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवसíîíî; राष्ट्रीय क्रीडा दिन íîíî; म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.



राज्यामध्ये क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरीकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्त्वे पोहचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक व युवतींमध्ये क्रीडा विषयक वातावरण निर्माण व्हावे, क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे यासाठी विविध उपक्रम राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येतात. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांचे विद्यमाने दि. २९ ऑगस्ट, २०२५ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीड जिल्हयातील उत्कृष्ट क्रीडा संघटक, क्रीडा प्रशिक्षक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गौरव जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांचे शुभहस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून करण्यात आला. सदर प्रसंगी मंचावर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी व राज्य खो-खो संघटनेचे माजी सरचिटणीस मा.प्रा. जे.पी. शेळके, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी मा. श्री. आबासाहेब आवारे, बीड जिल्हा हॉकी संघटनेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे माजी सदस्य मा. प्रा. दिनकर थोरात, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

उत्कृष्ट क्रीडा संघटक, प्रशिक्षक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गौरव प्रसंगी बीड येथे व जिल्हयात राज्याचे मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. श्री. अजित पवार यांचे मार्गदर्शनात क्रीडा क्षेत्राचा विकास करण्यात येईल, जिल्हा क्रीडा संकुलात रक्कम रूपये २५ कोटी रक्कमेचे अद्यायावत क्रीडांगणे व क्रीडा सुविधा तयार करण्यात येणार आहेत. तसेच तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणीही अद्यायावत तालुका क्रीडा संकुलाच्या उभारणीस जोमाने प्रयत्न करण्यात येत आहेत, अद्यायावत क्रीडा सुविधाच्या माध्यमातून खेळाडूंना उत्तम दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणार आहेत असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांनी केले. प्रथम हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांनी पुष्पहार अर्पन करून वंदन केले.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### कड्याचे माजी सरपंच संपत सांगळे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन

#### हजारोच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार

आष्टी । प्रतिनिधी



कडा शहराचे माजी सरपंच तथा उद्योगपती संपत दादा सांगळे यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.त्यांच्यावर कडा येथील स्मशानभूमीत हजारोंच्या संख्येने जनसमुदायच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अतिशय मनमिळाऊ, शांत, संयमी असे व्यक्तिमत्त्व असलेले कडा शहराचे माजी सरपंच संपत सांगळे यांचे शनिवार (दि.३०)रोजी दुपारी ४ च्या दरम्यान हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने राहत्या घरी निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ५३ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर कडा येथील स्मशानभूमीत रात्री ७.३० वा.हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

### भाजपा बीड शहर तर्फे गणेश मंडळाच्या माध्यमातून स्वदेशीचा नारा : अशोक लोढा

बीड । प्रतिनिधी



संपूर्ण जगामध्ये भारत देश हा तिसरी महासत्ता होणारा देश म्हणून आपली ओळख निर्माण करत असल्यामुळे अमेरिका सारख्या बलाढ्य महासत्तेला त्याची खदखद होताना दिसत आहे मागील दोन महिन्यापासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शंभर टक्के टेरिफ दर वाढवून भारतीय वस्तूंना अडचणीत आणण्याचा कुटील डाव रचला आहे भारताचे रशियासोबत व आता चीन सोबत सुधारत असलेले संबंधामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प भारताला अडचणीत आणण्यासाठी नवनवीन कायद्याच्या माध्यमातून त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत मागील दहा वर्षांमध्ये भारताची झालेली चौफेर प्रगती व जगात माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी विविध देशांशी सौंदाहर्यपूर्ण संबंध प्रस्थापित करून आपल्या भारताचे नाव जगात उंचावण्याचे काम केले आहे. भारतीय जनता पार्टी बीड शहर मंडळाच्या वतीने बीड शहरातील विविध गणेश मंडळाला विविध स्पर्धा देखावे व स्वदेशीचे फलक लावून स्वदेशी वस्तु बद्दल जनजागृती करण्याबाबत व पर्यावरण पूरक देखावे करणाऱ्या मंडळाला रोख पारितोषक प्रथम पुरस्कार -७००१/- द्वितीय पुरस्कार - ५००१/-, तृतीय पुरस्कार -३००१/- आणि प्रोत्साहन पर- ११०१/- पाच मंडळाला व सन्मानपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे. शहरातील सर्व प्रमुख गणेश मंडळांना विनंतीपूर्वक आव्हान करण्यात येते की आपण या राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवून हातभार लावावा असे आव्हान बीड शहर भारतीय जनता पार्टी अध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे.

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी



नेकनूर । प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे होते. तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. श्रीकृष्ण जाधव हे होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर ध्यानचंद यांच्या जीवन पटाविषयी माहिती सांगितली व विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे व आपल्या कार्यात नाविन्य मिळविले पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रीकृष्ण जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर ध्यानचंद यांनी हॉकी या खेळावर आपले प्राबल्य मिळविले हॉकी हे त्यांच्या अंगाला चिटकून गेल्यानंतर त्याचा गोल होत होता एवढे त्यांचे हॉकी खेळावर प्रभुत्व होते. त्यांनी भारताला हॉकी खेळामध्ये जागतिक लेव्हलवर उंच शिखरावर नेऊन ठेवलेले आहे.

### राजर्षी शाहू कन्या विद्यालयात भारतीय महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा

बीड । प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा क्षेत्रात ज्यांच नाव आदराने घेतले जाते तसेच हॉकीचे जादुगार म्हणून ज्यांची ओळख आहे असे भारतीय महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिन क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात मेजर ध्यानचंद व राजर्षी शाहू महाराज, राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे संस्थेचे सचिव प्रा.जे.पी. शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस.डी. कदम, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. आर. टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी.लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी क्रीडा दिनाचे औचित्य साधून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. जे. पी. शेळके साहेब यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापिका, मुख्याध्यापक,प्राचार्या,शिक्षक, शिक्षिका, व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# अतिवृष्टीने बाधित सरसकट पिकांचे पंचनामे करा: धनंजय मुंडेंच्या प्रशासनाला सूचना

- परळी मतदारसंघात पावसाने झालेल्या नुकसानीचा धनंजय मुंडे यांनी घेतला आढावा
- फुटलेली तलाव, खराब झालेले रस्ते आदींच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तात्काळ पाठवण्याचे निर्देश
- धोक्याची पातळी ओलांडलेल्या तलावांच्या बाबत सतर्क राहण्याच्या सूचना

परळी वै. । प्रतिनिधी

परळी वैजनाथ मतदारसंघात १५ जुलै नंतर पावसाचा जोर वाढत गेला, मागच्या काही दिवसात तर पावसाने शेती पिकांचे प्रचंड नुकसान केले असून अनेक ठिकाणी अजूनही शेतामध्ये गुडघाभर पाणी साचलेले आहे. त्यामुळे खरिपातील पिकांचे मोठे नुकसान होत असून, झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशा सूचना आज माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी स्थानिक प्रशासनास दिल्या आहेत;



तसेच याबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा करून संबंधितांना तसे आदेश देण्याचे सुचित केले आहे.

परळी मतदारसंघात मागच्या काही दिवसात अतिवृष्टी व अति पावसाने



झालेल्या नुकसानीचा समग्र आढावा आज धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्फत घेण्यात आला. यावेळी श्री मुंडे यांनी मंडळ आणि गाव निहाय झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला.

पावसामुळे ग्रामीण व शहरी भागात घरांची झालेली पडझड, पशूंची झालेली हानी याबाबत स्वतंत्र पंचनामे करणे तसेच स्थानिक आपत्ती निवारण निधीतून संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले असल्यास त्याबाबतचे तात्काळ द्यावयाचे अनुदान याबाबतही धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना ▶ उर्वरित पान २ वर

# करचुंडी येथील गायरान प्रश्न १३ व्या दिवशी धरणे आंदोलन सुरुच

## जिल्हा कचेरी समोरील चार आंदोलन पडले आजारी

बीड । प्रतिनिधी

करचुंडी येथील ग्रामस्थ गेल्या तीन पिढ्यापासून गायरान जमीन कसून आपली उपजीविका भागवत आहेत. काही लोकांचे नाव सातबारा ला लागले आहेत. तर काही लोकांचे नाव सातबारा मध्ये अद्याप लागले नाही. या मागणीसाठी १८ ऑगस्ट पासून हे बेमुदत ▶ उर्वरित पान २ वर





*भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नवनाथ आण्णा शिराळे यांची निवड झाल्याबद्दल दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये त्यांचा सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, या प्रसंगी ॲड. गोविंद शिराळे, महेंद्र वाघमारे छायाचित्रात दिसत आहेत.*

# बीड शहराला दररोज पाणीपुरवठा करा : पुरुषोत्तम उर्फ (गोटू )वीर

## बिंदुसरा प्रकल्प व माजलगाव प्रकल्प जिल्ह्यातील सर्व तलाव ओव्हरफुल

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील पाण्याच्या पुरवठ्या बाबत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. ज्यात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या नगर परिषदेतर्फे फक्त पंधरा दिवसांनी पाण्याचा पुरवठा केला जात आहे. या परिस्थितीत शहरात पाण्याची



गंभीर अडचण निर्माण झाली आहे. ▶ उर्वरित पान २ वर

# "बीडमध्ये आमदार अमितजी गोरखे यांचा अभूतपूर्व सत्कार"

## १०० किलो हार क्रेनने अर्पण ; समाजाच्या अपेक्षांना दिशा देणारे नेतृत्व

बीड । प्रतिनिधी

मातंग समाजभूषण तथा विधानपरिषद सदस्य आ. अमितजी गोरखे यांचे बीड शहरात प्रथम आगमन झाल्याने त्यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद (दादा) हातागळे यांच्या संकल्पनेतून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात हा भव्य सोहळा ▶ उर्वरित पान २ वर



# पुराचा बळी! धारुरमध्ये ऑटोसह वाहून गेलेल्या चालकाचा मृतदेह ३ दिवसांनी आढळला

धारुर । प्रतिनिधी

वाण नदीच्या पुरात आवरगाव येथे ऑटोसह वाहून गेलेला धारूर येथील चालकाचा मृतदेह अखेर तीन दिवसानंतर आढळून आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील विशेष बचाव व सुरक्षा पथक व धारूर अग्निशामक दल यांना चालक अनिल बाबुराव लोखंडे यांचा मृतदेह शोधून काढण्यात यश आले. घटनास्थळापासून साधारणत: अर्धा किलोमीटर अंतरावर नदीपात्राच्या बाजूस झाडीमध्ये अडकलेल्या अवस्थेत हा मृतदेह आज, शनिवारी (दि. ३०) सकाळी आढळून आला.

धारूर तालुक्यात बुधवारी (दि. २७) रात्री अतिवृष्टीमुळे वाण नदीला पूर येऊन धारूर-आसरडोह आणि धारूर-आडस मार्गावरील दोन पूल पाण्याखाली गेले. या दोन्ही ठिकाणी पुराच्या पाण्याच्या अंदाज न




आल्याने चारचाकी आणि रिक्षासह चालक वाहून गेले होते. दुसऱ्या दिवशी अंजनडोह येथे वाहून गेलेले आडत व्यापारी नितिन शिवाजीराव कांबळे (वय ४२) यांचा मृतदेह आढळून आला. मात्र, आवरगाव येथे वाहून गेलेला अनिल बाबुराव लोखंडे हे बेपत्ता होते. दोन दिवस शोधकार्य करून ही त्यांचा शोध महसूल व पोलीस पथकास लागला नाही.

झाडात आढळला मृतदेह- दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथील बचाव व सुरक्षा पथकास पाचारण करण्यात आले. त्यांनी धारूर येथील नगरपरीषदेच्या अग्निशामक दलासोबत शोधमोहीम सुरू केली. दरम्यान, आज सकाळी घटनास्थळापासून काही अंतरावर नदीपात्राच्या बाजूला झाडीमध्ये अडकलेला एक मृतदेह आढळून आला. मृताचा चेहरा माशांनी तोडल्यामुळे विद्रूप झाला होता. कपडे आणि नातेवाइकांनी सांगितलेल्या वर्णनावरून तो मृतदेह चालक अनिल बाबुराव लोखंडे यांचा असल्याचे स्पष्ट झाले.

यांनी राबवली शोध मोहीम- वाहून गेलेल्या चालकाच्या शोध मोहिमेत छत्रपती संभाजीनगर येथील बचाव व सुरक्षा पथकातील संपत भगत, अशोक खांडेकर, एच वाय घुगे, दिनेश मुंगसे, संग्राम मोरे, एन आर घुगे, धारूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक दलाचे बालासाहेब शिनगारे, संजय गायसमुद्रे यांनी सहभाग घेतला. तत्पूर्वी तहसीलदार श्रीकांत निळे, नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, वरिष्ठ लिपिक प्रकाश गोपड, मंडळ अधिकारी कपिल गोडसे, पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, उपनिरीक्षक बाबासाहेब भवर, नाना निगुळे आदि महसूल व पोलीस कर्मचाऱ्यांनी दोन दिवस घटनास्थळी तळ ठोकून शोध मोहीम राबवली.